बातमीपत्र

**पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर**

**माहिती कक्ष, दि ०१ नोव्हेंबर २०२३**

## विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ६१६/२०२३ भादवि ४९८(अ),४२७,४१९,३२३,५०४,५०६,३४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | माहे मार्च २०१९ ते माहे मार्च २०२३ चे दरम्यान, २६७/२२, रविवार पेठ, पाणी टाकी जवळ, शांती चौक, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०१/११/२०२३ रोजी १३.५५ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | सौ. ऋतुजा आकाश मोहिते, वय- २३ वर्षे, रा. अमन चौक, साईनाथ नगर, मजरेवाडी, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) आकाश शशिकांत मोहिते- पती, २) संगिता शशिकांत मोहिते- सासु, ३) किरण शशिकांत मोहिते- दिर, ४) विशाल शशिकांत मोहिते, सर्व रा २६७/२२, रविवार पेठ, पाणी टाकी जवळ, शांती चौक, सोलापूर , ५) प्रमोद रणदिवे, रा. मल्लिकार्जुन नगर, सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील वरील आरोपीतांनी मिळुन फिर्यादीस शारिरीक, मानसिक त्रास देवून, मारहाण केली आहे. तसेच आरोपीत क्रं. १ याचे विरुध्द गुन्हा दाखल झाल्यानंतर फिर्यादीस त्रास देवून, फिर्यादीच्या आई वडीलांकडुन २ लाख रुपये घेतले. नवीन ढोलीबाजा गाडी बनविण्याकरीता ५ लाख रुपये घेवून ये, तरच आमच्या घरी ये म्हणून फिर्यादीस माहेरी हाकलुन दिले आहे व फिर्यादीच्या ३ वर्षाच्या मुलाला ठेवून घेतले आहे. तसेच आरोपत क्रं. १ याने फिर्यादीस न सांगता दुसरे लग्न केले आहे म्हणून. तपास:- पोहेकॉ/ १२३४ गावडे- ८९९९५०८५१९ |

## जेलरोड पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ४१०/२०२३ भादवि ४२०,४०६ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. २२/०१/२०२१ रोजी पासुन ते दि. ०५/०५/२०२२ रोजी चे दरम्यान, मार्केट यार्ड, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०१/११/२०२३ रोजी १७.०९ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | सिध्दाराम चन्नप्पा बावकर, वय- ४३ वर्षे, व्यवसाय- व्यापार, रा. प्लॉट नं. ४६, धर्मराज नगर, शेळगी, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) विकी, विघ्नेश ॲन्ड कंपनी, बेंगलोर व इरोड/सेलम २) श्री एस नागमणी, रा. आलमकोलम, तमिळनाडु |
| **फसवणुक र** | : | ३८,७२,७४३/- रुपये असे |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीचे गाळा नं. ई/८६, सिध्देश्वर मार्केट यार्ड, सोलापूर येथे कांदा, लसुण, चिंच, बटाटा, लाल मिरची, गुळ असा शेतकऱ्यांकडुन माल घेवून व्यापाऱ्यांना होलसेल स्वरुपात सदरचा माल पुरवठा करीत असतात. यातील दि. २२/०१/२०२१ रोजी ते दि. ०४/०९/२०२१ रोजी पर्यंत शेतकऱ्यांकडुन घेतलेला कांदा यातील आरोपीत क्रं. १ यांना पाठवित होते. ते फिर्यादीस बँक खात्यावर पैसे पाठवत होते. नियमीत व्यापार सुरु असल्याने फिर्यादी यांनी विश्वासापोटी त्यांना शेतकऱ्यांकडुन घेतलेला कांदा पाठवुन दिलेला आहे. तसेच दि. १०/०१/२०२२ रोजी ते दि. ०५/०५/२०२२ रोजी पर्यंत घेतलेला कांदा यातील |

| | | |
|---|---|---|
| | | आरोपीत क्रं. २ यांना पाठविला आहे. यातील फिर्यादी यांनी वरील आरोपीतांना विश्वासापोटी दिलेला कांदा व लसुण शेतकऱ्यांकडुन घेवून दिला असल्याने फिर्यादीचे आरोपीत क्रं. १ याचेकडुन २७,७९,८३६/- रुपये व आरोपीत क्रं. २ याचेकडुन १०,९२,९०७/- रु असे पैसे मिळणेबाबत फिर्यादी यांनी मोबाईल वरुन फोन करुन पैसे देणेबाबत विनंती केली असता ते पैसे देण्यासाठी टाळा-टाळ करती असल्यामुळे फिर्यादी हे प्रत्यक्ष त्यांचे पत्यावर जावून भेटले असता ते पैसे देण्यासाठी टाळा टाळ करीत आहे. तरी यातील वरील आरोपीतांनी फिर्यादीची फसवणुक करण्याचे उद्देशाने फिर्यादीचा विश्वास संपादन करुन फिर्यादीची एकुण- ३८,७२,७४३/- रुपयेची फसवणुक केली आहे म्हणून. तपासः- सपोनि/ काळे- आर्थिक गुन्हेशाखा - ९५९४६७८३८३ |

## जेलरोड पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ४११/२०२३ भादवि ४२०,४०६ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. १४/१२/२०२१ रोजी पासुन ते दि. २९/१२/२०२१ रोजी चे दरम्यान, मार्केट यार्ड, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०१/११/२०२३ रोजी १७.०९ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | सिध्दाराम चन्नप्पा बावकर, वय- ४३ वर्षे, व्यवसाय- व्यापार, रा. प्लॉट नं. ४६, धर्मराज नगर, शेळगी, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) श्री कुट्टी लिंगेश्वर, रा. सुवेता गारमेन्ट, तिरुप्पुर तमिळनाडु, २) मुरली चंद्रशेखर, रा. तिरुप्पुर, तमिळनाडु |
| **फसवणुक र** | : | २२,८२,३१३/- रुपये असे |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीचे गाळा नं. ई/८६, सिध्देश्वर मार्केट यार्ड, सोलापूर येथे कांदा, लसुण, चिंच, बटाटा, लाल मिरची, गुळ असा शेतकऱ्यांकडुन माल घेवून व्यापाऱ्यांना होलसेल स्वरुपात सदरचा माल पुरवठा करीत असतात. यातील दि. १४/१२/२०२१ रोजी ते दि. २०/०१/२०२२ रोजी पर्यंत शेतकऱ्यांकडुन घेतलेला गुळ यातील आरोपीत क्रं. १ यांना पाठवित होते. ते फिर्यादीस बँक खात्यावर पैसे पाठवत होते. नियमीत व्यापार सुरु असल्याने फिर्यादी यांनी विश्वासापोटी त्यांना शेतकऱ्यांकडुन घेतलेला गुळ पाठवुन दिलेला आहे. तसेच दि. १३/१२/२०२१ रोजी ते दि. २९/१२/२०२१ रोजी पर्यंत घेतलेला गुळ यातील आरोपीत क्रं. २ यांना पाठविला आहे. यातील फिर्यादी यांनी वरील आरोपीतांना विश्वासापोटी दिलेला गुळ शेतकऱ्यांकडुन घेवून दिला असल्याने फिर्यादीचे आरोपीत क्रं. १ याचेकडुन १४,५३,५१८/- रुपये व आरोपीत क्रं. २ याचेकडुन ०८,२८,७९५/- रु असे पैसे मिळणेबाबत फिर्यादी यांनी मोबाईल वरुन फोन करुन पैसे देणेबाबत विनंती केली असता ते पैसे देण्यासाठी टाळा-टाळ करती असल्यामुळे फिर्यादी हे प्रत्यक्ष त्यांचे पत्यावर जावून भेटले असता ते पैसे देण्यासाठी टाळा टाळ करीत आहे. तरी यातील वरील आरोपीतांनी फिर्यादीची फसवणुक करण्याचे उद्देशाने फिर्यादीचा विश्वास संपादन करुन फिर्यादीची एकुण- २२,८२,३१३/- रुपयेची फसवणुक केली आहे म्हणून. तपासः- सपोनि/ काळे- आर्थिक गुन्हेशाखा - ९५९४६७८३८३ |